# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक २६/११/२०१८

## सभा सुचना क्रं. १३

| अु क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
| --- | --- | --- |
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि.०३/११/२०१८ व दि. १७/११/२०१८ रोजींचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव** :- दि. ०३/११/२०१८ व दि. १७/११/२०१८ चे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री.कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २. | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षण देण्याबाबत. | **ठराव** :- सदरच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली असुन मा.महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार महानगर पालिका हद्दीतील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षण देण्यात यावे. मार्गदर्शन करण्याकरीता महानगर पालिकेच्या संकेतस्थळावर दरपत्रके प्रसिध्दी करुन खाजगी संस्था, सेवाभावी संस्था व इच्छुक ठेकेदार यांच्यामार्फत दरपत्रक मागविण्याकरीता प्रती व्याख्यान २०००/- रुपये याप्रमाणे महाविद्यालयात व्याख्याने आयोजित करण्याकरीता त्या अनुषंगाने येणाऱ्या अंदाजे रुपये १,५०,०००/- रु. खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३. | वसई विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण समिती मार्फत महानगरपालिका हद्दीतील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व्यसना विषयी जागृती या विषयावर व्याख्याणे आयोजित करण्याबाबत. | **ठराव** :- सदरच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करणेंत आली असुन मा.महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार महानगरपालिकेच्या हद्दीतील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व्यसनाविषयी जागृती या विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात यावे. मार्गदर्शन करण्याकरीता महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दरपत्रके प्रसिध्दी करुन खाजगी संस्था, सेवाभावी संस्था, इच्छुक ठेकेदार यांच्यामार्फत दरपत्रक मागविण्याकरीता प्रती व्याख्यान २०००/- रुपये याप्रमाणे महाविद्यालयातील व्याख्याने आयोजित करण्याकरीता येणाऱ्या त्या अनुषंगाने अंदाजे रुपये १,५०,०००/- रु. खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्रीम. सुषमा लोपीस**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागा मार्फत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लैंगिक | **ठराव** :- सदरच्या विषयावर सविस्तर चर्चा करणेंत आली असुन मा.महिला व बालकल्याण समितीच्या शिफारशीनुसार महापालिका हद्दीतील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लैंगिक शिक्षणा सदंर्भात मार्गदर्शन करण्यांत यावे. मार्गदर्शन करण्याकरीता मार्गदर्शक महिला असावी याकरीता महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दरपत्रक प्रसिध्दी करुन खाजगी संस्था, सेवाभावी संस्था, इच्छुक ठेकेदार यांच्यामार्फत दरपत्रक |

| | | |
|---|---|---|
| | शिक्षणा संदर्भात मार्गदर्शन करणेबाबत. | मागविण्याकरीता व प्रती व्याख्याने २०००/- रुपये याप्रमाणे ६१ महाविद्यालयातील व्याख्याने आयोजित करण्याकरीता त्या अनुषंगाने येणाऱ्या अंदाजे रू. १,५०,०००/- रुपये खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्रीम. विद्या पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ५. | प्रभाग समिती सी मधील विरार (पू) प्रभाग क्र.२ मध्ये गोजावीर बाबा मंदिर ते क्रॉसींग पर्यंत पाईप गटार व पाथवे बनविणे कामी प्रशासकिय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- सन २०१८ -१९ या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका विरार (पु.) प्रभाग क्र. २ मध्ये गोजावीर बाबा मंदीर ते क्रॉसिंगपर्यंत पाईप गटार व पाथवे बनिविणे कामी रू. ४९,९१,७१२/-इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रकीय होणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे निविदा मागविण्यांत याव्यात असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री.किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ६. | प्रभाग समिती एफ, धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग क्र.४२ धानिव गाव येथील वैभव पाटील यांचे घरापासुन ते मुख्य गटारापर्यत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार सदर काम करणेस व सदर कामाच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.२२,४६,०३४/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामी विहीत प्रणालीनुसार निविदा मागविणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री.किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ७. | नविन बँक खाते उघडणे बाबत. | एच.डी.एफ.सी. बँकेने वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रूग्णालयाकरीता CSR अंतर्गत एक रूग्णवाहिका दिलेली आहे. प्रस्तावित केल्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेचे एच.डी.एफ.सी बँकेत सर्वसाधारण निधी खाते उघडण्यासाठी ही स्थायी समिती सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज ठाकूर सूचक :- मा.श्री.स्वप्नील बांदेकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ८. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील दि.१५/१०/२०१८ ते दिनांक २८/१०/२०१८ व दि.२९/१०/२०१८ ते दि.११/११/२०१८ या कालावधीत लावलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनांचे प्रतिवृत्त स्थायी समिती सभेपुढे माहितीसाठी सादर. | ठराव :- प्रस्तावात नमुद केलेनुसार उक्त कालावधीत लागलेल्या आगी व झालेल्या दुर्घटनेचे प्रतिवृत्त जे माहितीसाठी सभेस दिलेले आहे, त्याचे सभेने अवलोकन केले व त्यास ही सभा एकमताने मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अतुल साळूंखे सूचक :- मा.श्री.स्वप्नील बांदेकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ९. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ८ व्या राष्ट्रीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१८ साठी आर्ट वर्क (डिझाईन ) व इतर अनुषंगीक करणेकामीचे सर्वात कमी दराचे ई-निविदाधारक यांचे दर मंजुर करुन त्यांच्याशी करारनामा करणेंस, कामाचा कार्यादेश देणे याबाबत आर्थिक व प्रशासकीय मंजुर मिळणेबाबत. | ठराव :- वरील प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ८ व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१८ साठी आर्ट वर्क (डिझाईन) व इतर अनुषंगीक कामे करणेकामी प्राप्त ई-निविदेतील सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. राजेंद्र केशव वनमाळी यांची ई-निविदा मंजुर करणेंत येत असून त्यांच्याशी करारनामा करणेंस, कामाचा कार्यादेश देणेंस, कामाची होणारी देयके अदा करणेंस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ८ व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१८ साठी आर्ट वर्क (डिझाईन) व इतर अनुषंगीक कामे करणेकामी ईनिविदेतील मंजुर दराप्रमाणे रुपये ६,७१,४२०/- इतक्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. तसेच नामंजुर निविदाधारकास त्यांची अनामत रक्कम नियमानुसार परत करणेंस, ही सभा वित्तीय मंजुरी देत आहे.<br><br>अनुमोदक :- मा.श्री. नितीन राऊत   सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १०. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१८ साठी स्पर्धेचे साहित्य पुरविणे व इतर अनुषंगीक करणेकामीचे सर्वात कमी दराचे ई-निविदाधारक यांचे दर मंजुर करुन त्यांच्याशी करारनामा करणेंस, कामाचा कार्यादेश देणे याबाबत आर्थिक व प्रशासकीय मंजुर मिळणेबाबत. | ठराव :- वरील प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१८ साठी स्पर्धेचे साहित्य पुरविणे व इतर अनुषंगीक करणेकामी प्राप्त ई-निविदेतील सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.माय सॉफ्ट यांची ई-निविदा मंजुर करणेंत येत असून त्यांच्याशी करारनामा करणेंस, कामाचा कार्यादेश देणेंस, कामाची होणारी देयके अदा करणेंस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१८ साठी स्पर्धेचे साहित्य पुरविणे व इतर अनुषंगीक करणेकामी रुपये ११ लक्ष ५० हजार इतक्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. तसेच नामंजुर निविदाधारकास त्यांची अनामत रक्कम नियमानुसार परत करणेंस, ही सभा वित्तीय मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.विद्या पाटील   सूचक :- मा.श्रीम. नितीन राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ११. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१८ साठी सुरक्षा रक्षक (Security Guard), बाऊन्सर (Bouncer), सुरक्षतेचे साहित्य भाडेतत्वावर पुरविणे व त्या अनुषंगीक करणेकामीचे सर्वात कमी दराचे ई-निविदाधारक यांचे मंजुर करुन त्यांच्याशी करारनामा करणेंस , कामाचा कार्यादेश देणे याबाबत आर्थिक व प्रशासकीय मंजुर मिळणेबाबत. | ठराव :- वरील प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१८ साठी सुरक्षा रक्षक (Security Guard) , बाऊन्सर (Bouncer), सुरक्षतेचे साहित्य भाडेतत्वावर पुरविणे व त्या अनुषंगीक करणेकामी प्राप्त ई-निविदेतील सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.सक्ती सेक्युरिटी ॲण्ड फॅसेलिटी मॅनेजमेंन्ट सर्विस प्रा.लि यांची ई-निविदा मंजुर करणेंत येत असून त्यांच्याशी करारनामा करणेंस, कामाचा कार्यादेश देणेंस, कामाची होणारी देयके अदा करणेंस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१८ साठी सुरक्षा रक्षक (Security Guard) , बाऊन्सर (Bouncer), सुरक्षतेचे साहित्य भाडेतत्वावर पुरविणे व त्या अनुषंगीक करणेकामी रुपये १२ लक्ष इतक्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.तसेच नामंजुर निविदाधारकास त्यांची अनामत रक्कम नियमानुसार परत करणेंस. ही सभा वित्तीय मंजुरी देत आहे.<br><br>अनुमोदक :- मा.श्री. दिलीप गोवारी   सूचक :- मा.श्री.वैभव पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| १२. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ८ व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा | ठराव :- वरील प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ८ व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१८ साठी स्पर्धेचे इव्हेंन्ट मॅनेजमेन्ट करणे व त्या अनुषंगीक इतर कामे करणेकामी प्राप्त ई-निविदेतील दराचे निविदाधारक मे.आर्यन्ज स्पोर्ट्स पीआर ॲन्ड इव्हेंन्ट यांची ई-निविदा मंजुर करणेंत येत असून त्यांच्याशी करारनामा करणेंस, कामाचा कार्यादेश देणेंस, कामाची होणारी देयके अदा करणेंस ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे. तसेच या स्पर्धेचे इव्हेंन्ट मॅनेजमेन्ट करणारे मंजुर निविदाकार मे.आर्यन्ज स्पोर्ट्स पीआर ॲन्ड इव्हेंन्ट यांच्या मंजुर निविदा दर रुपये |

| | | |
|---|---|---|
| | २०१८ साठी स्पर्धेचे इव्हेंन्ट मॅनेजमेनट करणे व त्या अनुषंगीक इतर कामे करणेकामीचे सर्वात कमी दराचे ई-निविदाधारक यांचे दर मंजुर करुन त्यांच्याशी करारनामा करणेंस,कामाचा कार्यादेश देणे याबाबत आर्थिक व प्रशासकीय मंजुर मिळणेबाबत. | १६,०४,८००/- रक्कमेच्या शेकडा ७५% रक्कम रुपये १२,०३,६००/- इतके आगाऊ स्वरुपात तात्काळ अदा करणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ८ व्या राष्ट्रीय स्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २०१८ साठी स्पर्धेचे इव्हेंन्ट मॅनेजमेन्ट करणे व त्या अनुषंगीक इतर कामे करणेकामी ई-निविदेतील मंजुर दराप्रमाणे रुपये १६,०४,८००/- इतक्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

नगरसचिव

वसई-विरार शहर महानगरपालिका